ption of the place of occurrence (Contd.) :

टनेच्या जागेचे वर्णन (पुढे चालु)

दि. ७।११।१७ चे दुपारी ११/३५ वा. मरण पावले त्याचे पोस्ट मॉर्टम करुन त्याचे मरणोत्तर मेयो हॉस्पीटल नागपुर येथुन दि. १०।११।१७ रोजी कागद पत्र प्राप्त झाल्याने पो.स्टे. रामटेक येथे अप.क्र. ८२/१७ कलम २७९ ३०४(अ) भादवि R/w. १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हाचे तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार करण्याचे असल्याने पंच म्हणुन हजर राहावे. असे कळविल्या वरुन पंचानी सहमती दर्शवुन हजर आल्याने पंचा समक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मोरेश्वर श्रीराम उकलोडे ~~वय~~ ५० वर्ष रा वार्ड नं. ५ मनसर यांनी घटनास्थळ दाखविल्या वरुन घटनास्थळ पंचनामा तयार केला तो खालील प्रमाणे

सदरचे घटनास्थळ हे मनसर ते रामटेक जाणाऱ्या मनसर येथील दक्षिण मुखी अल्लीधाम समोरील रोडवरील असुन सदर रोड डांबरी रोड आहे. अंदाजे २० फुट रुंदीचा गिट्टी डांबराने तयार केलेला डांबर रोड आहे. घटना तारखेला प्रत्यक्ष ठिकाणी [illegible] पायदळ हे अल्लीधाम कडुन [illegible] कडे जात असता मनसर कडुन रामटेक कडे जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या आयशरने धडक मारुन अपघाती [illegible] होते. ती हिच जागा आहे असे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मोरेश्वर श्रीराम उकलोडे हे पंचासमक्ष घटनास्थळ ~~सांगुन दाखविला आहे~~. दाखवुन सांगत आहे.

सदर घटनास्थळाचे बारकाईने पाहणी केली असता घटनास्थळी कोणत्याही प्रकारची संशयीत वस्तु मिळुन आली नाही.

सदर घटनास्थळाचे चतुरसीमा खालील प्रमाणे पुर्वेस रामटेक कडे जाणारा डांबरी रस्ता असुन पश्चिमेस मनसर कडे जाणारा डांबरी रोड आहे उत्तरेस दक्षिण मुखी अल्लीधाम मंदिर असुन दक्षिणेस रामटेक ते मनसर जाणारा डांबरी रोड त्यानंतर रमेश चिचुलकर यांचे उत्तर मुखी घर आहे

सदर घटनास्थळ पंचनामा पंचासमक्ष सांगे व दिसल्या प्रमाणे तयार करण्यात आला असुन पंचानी वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन सह्या केल्या आहेत.